Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२४/ ३६३ दिनांक : ०८.१०.२०२४

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक,**
**सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर.**

विषय : पदवी प्रथम ते सहावे सत्र (P-2013 & 2014) अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका मूल्यांकनाबाबत.
संदर्भ : १. परीक्षा/समन्वय/२०२४/३२७, दि. १०.०९.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली कार्यपध्दती.
२. परीक्षा/समन्वय/२०२४/३५३, दि. २५.०९.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले पत्र.
३. परीक्षा/समन्वय/२०२४/३५८, दि. ०३.१०.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले पत्र.
४. परीक्षा/समन्वय/२०२४/३६१, दि. ०५.१०.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात वेळापत्रक.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, पदवी प्रथम ते सहावे सत्र (P-2013 & 2014) अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२४ मध्ये होणाऱ्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर आयोजित करुन निकाल घोषित (Home Center & Home Assessment) करण्यात याव्यात व सदर प्रक्रिया ही प्रस्तुत विद्यापीठाने पदवी प्रथम वर्ष प्रथम सत्र अव्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता प्रसिध्द केलेल्या कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी असे संदर्भिय पत्र क्र. ०२ नुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार पदवी प्रथम ते सहावे सत्र (P-2013 & 2014) अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२४ मध्ये होणाऱ्या परीक्षा ह्या दि. ०८.१०.२०२४ पासून सुरु होणार असुन संदर्भिय पत्र क्र. ०१ नुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या कार्यपध्दतीतील 'ब' मधील अनुक्रमे मुद्दा क्र. ०१ व ०३ अन्वये उत्तरपत्रिका मूल्यमापन करुन घेण्याची कार्यवाही करण्यासाठी संबधित महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक तथा परीक्षा केंद्र प्रमूख हे प्रमूख असतील व संबधित विषयाची परीक्षा झाल्यांनतर पुढील पाच (०५) दिवसांच्या आत उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करुन गुणयाद्यांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करुन संबधित विषयाचे अध्यापक व प्राचार्य यांनी मूळ गुणयाद्या, ऑनलाईन नोंदणी करुन संगणकीय प्रणालीव्दारे जनरेट झालेल्या गुणयाद्यांच्या प्रत्येक पानावर स्वाक्षरी करणे अनिवार्य असेल.

**तसेच परीक्षा महाविद्यालय स्तरावर आयोजित करुन निकाल घोषित (Home Center & Home Assessment) करण्याच्या अनुषंगाने संदर्भिय पत्र क्र. ०१ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करुन कार्यवाही करण्यात यावी व प्रस्तुत विद्यापीठामार्फत या अनुषंगाने वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या पत्रांची नोंद घेण्यात यावी.**

करिता, सर्व संबधित महाविद्यालय/परिसंस्थांनी उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन उत्तरपत्रिका मूल्यांकन करुन व इतर सर्व प्रकारची कार्यवाही करण्यात यावी.

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**